# पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी -४११०१८
## भूमि आणि जिंदगी विभाग

E-mail : landestate@pcmcindia.gov.in
Website : www.pcmcindia.gov.in

दूरध्वनी क्र. : ०२०६७३३१५३७


### *जाहीर प्रकटन*

मा. सर्वोच्च न्यायालयाने दि.9/9/2013 रोजी दिलेले आदेश विचारात घेवून महाराष्ट्र शासनाने यापुर्वी यासंदर्भात देण्यात आलेले सर्व आदेश अधिक्रमीत करुन केंद्र शासनाच्या राष्ट्रीय फेरीवाला धोरण 2009 ची राज्यात अंमलबजावणी करण्याकरिता राज्यातील सर्व महानगरपालिका व नगरपालिका यांना शासन निर्णय क्र.राफेधो-2013/प्र.क्र.39/नवि-34 दि.21 ऑक्टोंबर 2013 अन्वये आदेशित केले आहे. सदर निर्णयानुसार यापुर्वी सुधारित केंद्रीय फेरीवाला धोरण अंमलबजावणीकामी स्थापन केलेली मा.शहर फेरीवाला समिती बरखास्त करुन राष्ट्रीय फेरीवाला धोरण 2009 मधील परि.4.5.1 मध्ये नमूद केलेप्रमाणे मा.शहर फेरीवाला समितीची पुनर्रचना करणे कामी अर्ज मागविणेत येत आहेत.

मा.शहर फेरीवाला समितीमध्ये नियुक्त करावयाच्या सदस्यांचा प्रकार ( प्रवर्ग) मधील एकुण 4 प्रवर्गापैकी प्रवर्ग क्र. 1 मध्ये नियुक्त करावयाच्या शासकीय अधिका-यांची नियुक्त करणेत आली आहे.सदर प्रवर्गामध्ये नियुक्त केलेली सदस्य संख्या 7 इतकी आहे.

| अ.क्र | (प्रवर्ग – 2) | (प्रवर्ग – 3) | (प्रवर्ग – 4) |
|---|---|---|---|
| | **फेरीवाला संघटनांचे प्रतिनीधी शहर फेरीवाला समितीचे एकुण सदस्यापेकी 40% इतके सदस्य (एकुण 14 सदस्य त्यापैकी किमान 4 महिला सदस्य)** | **रेसिडेन्ट वेलफेअर असोसिएशन्स, समुदाय आधारित संघटना ( कम्यनिटी बेस ऑरगनायजेशन्स) शहर फेरीवाला समितीचे एकुण सदस्यापैकी 20% इतके सदस्य(एकुण 7 सदस्य त्यापैकी किमान 2 महिला सदस्य)** | **1. इतर नागरी ( सिव्हील) संस्था संघटना,जशा NGO<br>2. व्यावसायिक समूहातील प्रतिनीधी (जसे वकील, डॉक्टर, नगररचनाकार , आर्किटेक्ट,इ.)<br>3. व्यापार व वाणिज्य समुहाचे प्रतिनीधी ,<br>4. शेडयुल्ड बॅकांचे प्रतिनीधी<br>5. महत्वाचे नागरिक ( Eminent Citizen)<br>शहर फेरीवाला समितीचे एकुण सदस्यांपैकी 20% इतके सदस्य( एकुण 7 सदस्य त्यापैकी किमान 2 महिला )** |
| वरील प्रवर्गामध्ये नियुक्त करावयाच्या प्रकारानुसार अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे | | | |
| 1 | फोटो ओळखपत्रासह पिं.चि.मनपा हद्दीतील रहिवासाचा पुरावा | फोटो ओळखपत्रासह पिं.चि.मनपा हद्दीतील रहिवासाचा पुरावा | 1. फोटो ओळखपत्रासह पिं.चि.मनपा हद्दीतील रहिवासाचा पुरावा |
| 2 | ज्या संघटनेचे प्रतिनीधी म्हणून काम पाहत असतील त्या नोंदणीकृत फेरीवाला संघटनाचे लेटरहेड वर सक्षम प्राधिका-यांचे शिफारसपत्र | रेसिडेन्ट वेलफेअर असोसिएशन्स / कम्यनिटी बेस ऑरगनायजेशन्स नोंदणी केलेचे प्रमाणपत्राची प्रत<br>सदर संस्थेचे लेटरहेड वर सक्षम प्राधिका-यांचे शिफारसपत्र | 1. NGO संबंधित नोंदणीकृत संस्थेचे लेटरहेडवर सक्षम प्राधिका-याचे शिफारसपत्र<br>2. मान्यताप्राप्त विद्यापीठाची वकील, डॉक्टर , नगररचनाकार , आर्किटेक्ट इ. ची पदवी प्रमाणपत्राची प्रत व सदर क्षेत्रातील |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | अनुभव असलेबाबतचे विवरणपत्र.<br>3. व्यापार /वाणिज्य समूहाबाबत संबंधित नोंदणीकृत संस्थेचे लेटरहेडवर सक्षम प्राधिका-याचे शिफारसपत्र<br>4. शेडयुल्ड बॅकांचे प्रतिनीधी असलेबाबतचे प्रमाणपत्राची प्रत व बॅकेचे संचालक मंडळाचे शिफारसपत्र<br>5. महत्वाचे नागरिकांबाबत सामाजिक कार्याचा अनुभव असलेबाबतचे माहितीचे विवरणपत्र |

तरी वरील तक्यात नमूद केलेप्रमाणे पिंपरी चिंचवड मनपा हद्दीतील अशा संस्था/ संघटनांनी शहर फेरीवाला समितीवर स्वेच्छेने काम करण्याकरिता आपले प्रतिनीधी सदस्य म्हणून नियुक्त करण्याकरिता पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या भूमि आणि जिंदगी विभागामध्ये पोस्टाने अथवा समक्ष लेखी अर्ज (सोबतचे नमून्याप्रमाणे) या प्रकटनाचे प्रसिध्दी दिनांकापासून दि. 6/12/2013 अखेर कार्यालयीन वेळेत आमच्या कार्यालयात सादर करावेत.

**टिप –1.कोणतीही नोंदणीकृत संस्था कमाल 2 व्यक्तीकरिता शिफारसपत्र देवू शकेल 2 पेक्षा जास्त आलेल्या शिफारसपत्राचे अर्ज विचारात घेतले जाणार नाही.**

**2.राष्ट्रीय फेरीवाला धोरण 2009 , शासन निर्णय इ.बाबतची आवश्यक त्या माहितीची कागदपत्रे कार्यालयीन वेळेत संस्था / संघटनांना पाहण्यासाठी ठेवण्यात आली आहेत.तसेच याबाबतचे अधिक माहितीसाठी 020 67331537 या दुरध्वनी क्रमांकावर सकाळी 10.00 ते 5.00 या वेळेत संपर्क साधणेत यावा.**

**3. शहर फेरीवाला समितीचा सदस्य होणेकामी करावयाच्या अर्जाचा नमूना सोबत जोडणेत आला आहे.**

सही/-
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -18

कार्यालयाचा पत्ता-
सहाय्यक आयुक्त , भूमि आणि जिंदगी विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी – 18
जाहीरात क्र.309
क्र.भूजि/1/कावि/423/2013
दि. 25/11/2013

पिंपरी चिंचवड महानगरपालिका , पिंपरी – 411 018

भूमि आणि जिंदगी विभाग

राष्ट्रीय फेरीवाला धोरण 2009

शहर फेरीवाला समितीचा सदस्य होणेकामी करावयाचा अर्जाचा नमूना

1. अर्जदाराचे नाव –------------------------- वय- ----------- स्त्री / पुरुष
2. अर्जदाराचा संपुर्ण पत्ता (कायमस्वरुपी) -________________________________________
3. अर्जदाराचा सद्याचा पत्ता - ________________________________________
4. शिक्षण – मूळ राज्य -
5. भ्रमणध्वनी क्र. दुरध्वनी .-
6. शहर फेरीवाला समितीचा प्रवर्ग क्रमांक– प्रवर्ग क्र.2 प्रवर्ग क्र.3 प्रवर्ग क्र.4
7. शहर फेरीवाला समितीचे प्रवर्गामधील विवरण -________________________________________

अर्जदाराची स्वाक्षरी

सहपत्रे-

1. फोटो ओळखपत्र – पासपोर्ट ,पॅन कार्ड , वाहन परवाना , निवडणूक ओळखपत्र , इ. पैकी एक

2. रहीवासी पुरावा – (पासपोर्ट ,चालू लाईट बील , रेशनकार्ड , आधारकार्ड , टेलीफोन बील , मिळकतकर उतारा इ. पैकी एक)

3.शैक्षणिक पात्रतेचा पुरावा -

4.प्रवर्ग निहाय संस्थेचे शिफारसपत्र -

5.इतर-

(टिप -उपरोक्त नमूद केलेली सर्व कागदपत्रे ही सक्षम प्राधिका-याकडून सांक्षाकित करुन द्यावीत)